## नियमित दिवाणी दावा क्र. ३०/२०२२ मधील नि.क्र. २४ वरील आदेश

०१. प्रस्तुत अर्ज वादीतर्फे साक्षीदारास साक्षी समन्स काढण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. वादीच्या म्हणण्यानुसार, प्रस्तुत दाव्यामध्ये दाखल केलेला खरेदी दस्त हा दस्तलेखनिक एच. के. कुंभार यांनी लिहीलेला असून सदर खरेदीदस्तावर एच. के. कुंभार यांची सही आहे. करीता, एच. के. कुंभार यांची साक्ष नोंदवणे गरजेचे आहे. करीता, साक्षीदार एच. के. कुंभार, स्टॅम्प व्हेंडर, वडूज, तहसिल कार्यालय, वडूज, तालुका - खटाव, जिल्हा - सातारा यांना साक्षी समंस काढणेत यावे अशी वादीने विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास सक्त हरकत नोंदविली आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे असे म्हणणे आहे की, वादीने साक्षीदार याने कोणता दस्त लिहीला आहे याची तारीख अगर नंबर अर्जात नमूद केलेला नाही. केवळ दाव्याचे काम प्रलंबित रहावे म्हणून प्रस्तुतचा अर्ज दिला आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी विनंती केली आहे.

०३. वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०४. प्रस्तुत दाव्याच्या अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले असता असे सरळ-सरळ दिसून येते की, प्रस्तुत दावा हा जाहिर ठराव व निरंतर ताकीदीकरीता दाखल करणेत आलेला आहे. माझ्या मते, वादी व प्रतिवादी यांचेमधील प्रलंबित असलेल्या वादाचे कायमस्वरुपी निराकरण करण्यासाठी वादी यांचा प्रस्तुत अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरेल. प्रस्तुत अर्ज नामंजूर केला तर वादी यांना त्यांची बाजू सिध्द करण्याची संधी मिळणार नाही. त्यामुळे दाव्याची गुंतागुंत वाढेल. प्रस्तुत प्रकरणातील दोन्ही पक्षांमधील वाद समुळ निकाली काढण्यासाठी प्रस्तुत अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींना वादीच्या साक्षीदारांचा उलटतपास घेण्याची संधी मिळणार आहे व उलटतपास दरम्यान प्रतिवादींना वादीच्या साक्षीदाराची सत्यता तपासण्याची संधी प्राप्त होणार आहे. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने अर्जात नमूद केलेल्या साक्षीदारास साक्षी समन्स काढण्यात यावे.

SALIM PIRMAHAMAD SAYYAD
Digitally signed by SALIM PIRMAHAMAD SAYYAD
Date: 2026.01.09 15:19:35 +0530

दि.०६.०१.२०२६. (सलीम पी. सैय्यद )

२रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, वडूज.